# प्रभात

सातारा । सोमवार । दि. १० मे २०२१



सातारा : कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या समाधिस्थळी अभिवादन करताना ना. बाळासाहेब पाटील, डॉ. अनिल पाटील व मान्यवर.

# कर्मवीरांची ६२ वी पुण्यतिथी साताऱ्यात साधेपणाने साजरी

**सातारा, दि. ९ (प्रतिनिधी)** - सर्व जातिधर्माच्या गोरगरिबांना आपल्या भगीरथ प्रयत्नांनी आधुनिक शिक्षणाची कवाडे खुली करून देणारे महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक, शिक्षण प्रसारक व रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची ६२ वी पुण्यतिथी रयत शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यालयात साधेपणाने साजरी करण्यात आली.

सहकार, पणन व जिल्ह्याचे पालकमंत्री बाळासाहेब पाटील, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, डॉ. भारती पाटील, सचिव व प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, सहसचिव व प्राचार्या डॉ. प्रतिभा गायकवाड, संस्थेचे कायदा सल्लागार ॲड. दिलावर मुल्ला, ऑडिटर प्रा. डॉ. शिवलिंग मेणकुदळे, रयत शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या समाधिस्थळी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कोविड१९ विषाणूमुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीत शासनाच्या सर्व नियमांचे पालन करण्यात आले. कर्मवीरांना अभिवादन केल्यानंतर ना. बाळासाहेब पाटील यांनी डॉ. अनिल पाटील यांच्याकडून संस्थेतील करोनाबाधित सेवकांची माहिती घेतली. त्यांच्यावरील उपचारांसाठी आवश्यक असलेली मदत करण्याचे आश्वासन दिले. रयत शिक्षण संस्थेतील सेवकांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी २.७५ कोटी रुपयांची मदत केली आहे. करोनाबाधित झालेले सेवक व विद्यार्थ्यांना आणि दुर्दैवाने ज्यांचा मृत्यू झाला आहे, त्यांच्या वारसांना मदत करण्यासाठी संस्थेने एक कोटी वीस लाख रुपयांचा निधी उभा केला आहे. त्याचबरोबर संस्थेच्या ३९ शाखांमध्ये कोविड मार्गदर्शन व मदत केंद्रे सुरू केल्याची माहिती डॉ. पाटील यांनी दिली. डॉ. पाटील यांच्या हस्ते ना. बाळासाहेब पाटील यांचा रयत महावस्त्र, कर्मवीरअण्णांचा चरित्रग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.